## शुभेच्छा संदेश

काव्यप्रेमी शिक्षक मंच या साहित्य सेवेला वाहिलेल्या व्यासपीठातर्फे 'कविता स्वातंत्र्याच्या' हा प्रातिनिधिक कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. प्रथमतः या मंचचे मी अभिनंदन करतो. देशभक्तीने झपाटलेल्या १६१ कविंचे मला खूप कौतुक वाटत आहे. आज आपला देश कोणत्या संकटात आहे याची आजच्या तरुणाईला जाणीवही नाही त्याहून महत्वाचे म्हणजे त्यांना त्याची गरजच वाटत नाही, अशा योग्यवेळी या शिक्षकवृंदानी 'कविता स्वातंत्र्याच्या' या प्रातिनिधिक कवितासंग्रहाचे काम हाती घेऊन फार मोठे कार्य केले आहे म्हणून मलाही म्हणावेसे वाटते,

जर देश आपला जगला
तर जगतील देवही सारे
घेऊन धूर सोन्याचा
वाहतील सुगंधी वारे

अशी अवस्था आणायची असेल तर तरुणांमध्ये देशभक्ती रुजवणे आवश्यक आहे आणि हेच पवित्र कार्य हे शिक्षक करीत आहे. एकाच विषयावर शिक्षक कविंनी कविता करणे खरोखरच समाधान देणारी गोष्ट आहे. त्यामुळे तरुणांमध्ये देशभक्ती विषयी आकर्षण निर्माण होऊन त्या दृष्टीने पाऊले पडतील असे मला वाटते. हा संग्रह निश्चीतच प्रेरणादायी ठरेल.

हे माझ्या भारत माते
घे पाप आमुचे पोटी
ही देशभक्तांची गाणी
येऊ दे आमुच्या ओठी

माधव पवार

**रत्नप्रिया प्रकाशन,**
सी-२४०, सिंधू विहार, विजापूर रोड, जुळे सोलापूर- ४१३ ००८
भ्रमणध्वनी – ७३९७८१३२३६
इमेल – ratnapriyapublications@gmail.com
ISBN-978-81-935150-5-4


रत्नप्रिया प्रकाशन, सोलापूर

कविता स्वातंत्र्याच्या.... (प्रातिनिधिक कवितासंग्रह)

2017-18

# कविता स्वातंत्र्याच्या....

प्रातिनिधिक कवितासंग्रह



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

काव्यप्रेमी शिक्षक म

* कविता स्वातंत्र्याच्या
KAVITA SWATANTRYACHYA

* ISBN - 978- 81- 935150 - 5 -1

© सर्व हक्क सुरक्षित

* प्रकाशक :
रत्नप्रिया प्रकाशन, सोलापूर
संवाद क्रमांक : ७३९७८१३२३६
ई–मेल : ratnapriyapublications@gmail.com

* अक्षरजुळणी : प्रदीप शं. कोडगीमठ

* मुखपृष्ठ : संतोष भुसणगी

* मुद्रण : सचिन ऑफसेट, सोलापूर

* प्रथमावृत्ती : १ जानेवारी २०१८ * मूल्य : २००/– रूपये

**संपादक मंडळ**

| संपादक | सह संपादक |
|---|---|
| **सौ. जया नेरे** | **प्रा. सत्येंद्र राऊत** |

**संपादन सदस्य**

| | |
|---|---|
| श्री. आनंद घोडके | सौ. आशा पाटील |
| श्री. पी. नंदकिशोर | श्री. कृष्णा शिंदे |
| श्री. कालीदास चवडेकर | श्री. रामदास देशमुख |
| श्री. राष्ट्रपाल सावंत | श्री. भाऊसाहेब कोळेकर |
| श्री. संदीप वाघोले | श्री. अमर पाचवे |
| श्री. दीपक सपकाळ | श्री. गुरुदत्त वाकदेकर |
| श्री. भाऊसाहेब सोनवणे | श्री. शाम स्वामी |



**अर्पणपत्रिका**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाहुती देणाऱ्या सच्चा सुपुत्रांना

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

## अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १५१) सुखाचे दिन आम्ही पाहिले ! | राष्ट्रपाल सावंत | १५१ |
| १५२) खरे स्वातंत्र्य | दीपक एस. सपकाळ | १५२ |
| १५३) गाथा शौर्याची | पी. नंदकिशोर | १५३ |
| १५४) शतदा तुला सलाम | कृष्णा शिंदे | १५४ |
| १५५) इतिहासाच्या पानोपानी | कालिदास चवडेकर | १५५ |
| १५६) क्रांतीवीर | भाऊसाहेब सोनवणे | १५६ |
| १५७) सामर्थ्य | भाऊसाहेब कोळेकर | १५७ |
| १५८) विजयगान | सौ. आशा पाटील | १५८ |
| १५९) स्वातंत्र्याची पहाट | संदीप वाघोले | १५९ |
| १६०) वंदन | प्रा. सत्येंद्र राऊत | १६० |
| १६१) हे स्वतंत्र भारतमाते | आनंद घोडके | १६१ |
| १६२) ध्वज तिरंगा | सौ. जया नेरे | १६२ |




# तिरंगा

भारतभूचा फडकत ध्वज हा अभिमानाने उरी वसे
त्रिरंग ज्याचे उजळून येती शौर्य, शांती समृद्धी वसे ।। धृ ।।

पराक्रमाचा रंगच भगवा भाळी अमुच्या शोभतसे
रुधिर वीरांचे मिसळून ऐसे अधिक प्रज्वलित होत असे

सबल दुर्बला सदैव रक्षित परंपरा ही अशी ठसे
अभिमानास्पद रंग केवढा राष्ट्रध्वजाचा मान असे ।। १ ।।

विश्वशांतीचा रंग पांढरा हृदयी आमुच्या वसत असे
विविध पंथिच्या या रयतेला एकपणाने रंगत असे

कोटी कोटी या रविकिरणांचा प्रकाश केवळ धवल असे
पुसून टाकी तिमिर आमुचे काय तयाची शान असे ।। २ ।।

रंग वृद्धीचा हिरवा येथे ऐश्वर्याची खाण असे
कणाकणातून या मातीच्या श्रीमंतीचे वाण असे

सदैव ऐश्वर्यात भारता राहो आमुचे स्थान असे
पूर्णत्वाची अमोल जाणीव या रंगापरी होत असे ।। ३ ।।

अशोक चक्रांकिता ध्वजा ही केंद्रबिंदू हा वंद्य असे
त्या चक्रापरी जीवन आपुले सतर्क अन् गतिवान असे

शिरी मंदिरी ठेवू तयाला पायतळी नच नेऊ असे
मानवंदना अर्पण त्याला अभिवादन त्या देऊ असे ।। ४ ।।

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

**संदीप बाक्रे (स्वैर)**, मो. : ९८३३९२८८८९
जीवनश्री कॉ.हा.सो. पांडुरंग वाडी, गोरेगाव(पु.),मुंबई

## वंदन

भारत भूच्या शूरवीरांना ।
वंदन करितो सदैव मी ।।

वंदन पहिले शिवरायांना
स्वराज्याचा पाया रचला ।
वीरप्रताप महाराणाला
वंदन करितो सदैव मी ।।

नमन माझे ज्योतीबांना
शिक्षणाने हा देश घडविला ।
विद्यादेवी त्या सावित्रींना
वंदन करितो सदैव मी ।।

गांधी, नेहरु अन सुभाषचंद्र
मिळवून दिले आम्हा स्वातंत्र्य ।
आझाद भगतसिंग टिळकांना
वंदन करितो सदैव मी ।।

विविधतेतही एकता आणूनी
भारताचे संविधान घडविले ।
कायदे पंडित आंबेडकरांना
वंदन करितो सदैव मी ।।

भारत माझा मी भारताचा
अभिमान सार्थ शहीदांचा ।
बलाढ्य सुंदर समृद्ध देशा
वंदन करितो सदैव मी ।।

प्रा. सत्येंद्र संगाप्पा राऊत, मो. ७३८७३९४७४७
मु.पो. अणदूर ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद



## हे स्वतंत्र भारतमाते

हे स्वतंत्र भारतमाते
शतशत नमन तुला ।। धृ ।।

जहर पेरूनी गोऱ्यांनी
छेद केले बंधूभावाला
लुटूनिया माणिक मोती
दास बनवले देशाला ।। १ ।।

जुलूमांची कहर झाली
अन् सुपूत्र जागा झाला
रक्त सांडले देशासाठी
इतिहास महा घडला ।। २ ।।

आसेतु हिमाचल सारा
गनिमावरी खवळला
अन् देशभक्तीचा नारा
दिगदिगंतरी गुंजला ।। ३ ।।

अहिंसेचे शस्त्र शांतीचे
घेऊनी मवाळ लढला
प्राण घेऊनी तळहाती
जोशाने जहाल झुंजला ।। ४ ।।

हे स्वतंत्र भारतमाते
अभिमान तुझा मजला
पुत्र म्हणूनी प्राणाहूनी
जपेन जननी तुजला ।। ५ ।।

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

आनंद घोडके, ७३९७८१३२३६
सोलापूर